परिपत्रक

जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/आ.३ /२०१९/ 3066
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- 26 /०४/ २०१९

प्रति,

**संस्थाचालक / प्राचार्य,**
**सर्व शासनमान्य संगणक टंकलेखन संस्था**
**महाराष्ट्र राज्य व गोवा.**

**विषय :- शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) परीक्षा जुलै २०१९** परीक्षेचे आवेदनपत्र भरणेसाठीची नुतनीकरणाचे आदेश प्राप्त होईपर्यंत क्षमता शिथील करणेबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) परीक्षा जुलै २०१९ या परीक्षेसाठी नोंदणीसह आवेदनपत्र भरणे प्रक्रिया सुरु आहे.

सदरची आवदेनपत्रे ही विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडून दिलेल्या मान्य क्षमतेनुसारच भरण्यात येत आहेत. काही संस्थांचे नुतनीकरण व वाढीव संगणक सेटअप प्रस्ताव हे विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे सादर करण्यात आलेले आहेत. सदर प्रस्ताव हे सर्व अधिकारी व कर्मचारी निवडणुक कामकाजात व्यस्त असल्याने प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब लक्षात घेता आवेदनपत्र भरताना क्षमतेनुसार भरणे ही अट पुढील आदेशापर्यंत शिथील करण्यात येत आहे.

सदर निवडणुक प्रक्रिया पूर्ण झाल्यावर ज्या संस्थांचे नुतनीकरण आदेश व वाढीव सेटअप आदेश प्रत ही विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (माध्य) यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपलोड करावी. अन्यथा त्या संस्थांचा जुलै २०१९ परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात येणार नाहीत. याची सर्व संस्थाचालक / प्राचार्य यांनी नोंद घ्यावी.

**(तुकाराम सुपे )**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१**

**प्रत :-**

1. **विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)**
2. **शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. (सर्व)**
3. **शिक्षण निरीक्षक (उ/द/प)**